# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

**विषय:- भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शौचायलांची सेप्टीक टाकी सफाई कामी सक्शन वाहन व सिवर लाईन सफाईकामी जेटींग वाहन खरेदी करणेबाबत.**

**संदर्भ- १) शासन परिपत्रक क्र. राअस./मैला व्यवस्थापन नरीमन पॉईंट, मुंबई ४०००२१/११३९/२०२२ दि.३० नोव्हेंबर, २०२२**
**२) मा. उप-आयुक्त सो., (आरोग्य) यांचे मौखीक निर्देश.**

**<u>प्रस्तावना :-</u>**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये केंद्र शासनाने दि.०६ डिसेंबर २०१३ रोजी पासून हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन अधिनियम २०१३ लागू केला आहे. त्या अधिनियमातील अंतर्भूत मुद्दे तसेच संदर्भ क्र. १ नुसार सेप्टीक टँकची संख्या सुनिश्चित केल्यानंतर प्रतियषी शहरातील एकुण सेप्टीक टँक पैकी किमान ३३ टक्के सेप्टीक टँकचा उपसा केले जाईल अशा प्रकारे नियोजन करून सार्वजनिक स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य राखण्यासाठी निर्धारीत वेळापत्रकानुसार ३ वर्षातून किमान १ वेळा सेप्टीक टँक उपसा करणे गरजेचे आहे व त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याने भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शौचायलांची सेप्टीक टाकी सफाई कामी सक्शन वाहन व सिवर लाईन सफाई कामी जेटींग वाहन खरेदी बाबतचा प्रस्ताव शौचालय व्यवस्थापन विभागामार्फत सादर करण्यात आला होता.

परंतु सदर वाहन खरेदी करणे बाबत शौचालय विभागातील लिपीक व अधिकारी यांना तांत्रिक बाबींची माहिती नसल्याने सदर वाहन खरेदी करणेची नस्ती वाहन विभागास प्राप्त झाली असता मा. उप आयुक्त सो (आरोग्य) यांच्या सोबत झालेल्या चर्चेनुसार OEM विक्रेत्यांकडे उपलब्ध असलेली ६ चाकी जेटींग व सक्शन वाहने खरेदी करणे कामी निर्देश दिले आहेत.

१) शासनाच्या GeM पोर्टल वर तपासले असता असे निर्देशनास येत आहे की, OEM विक्रेत्यांकडे उपलब्ध असलेले व Chassis Gross Vehicle Weight ७३००KG असेलेले सर्वात कमी दराचे सक्शन वाहन Product Id ५११६८७७-५७८७०५६६२६१ EGI--ELITE GREEN INDIA Diesel Medium Motor Vehicle Truck Mounted Suction Machine, TATA ७१०, Total Tank Capacity (sludge tank+water tank) ३५०० liter क्षमता रु. २४,५०,०००/- या दरामध्ये उपलब्ध आहे.

२) तसेच GeM पोर्टल वर तपासले असता असे निर्देशनास येत आहे की, OEM विक्रेत्यांकडे उपलब्ध असलेले व Chassis Gross Vehicle Weight ७४९० KG असलेले सर्वात कमी दराचे जेटींग वाहन Product Id: ५११६८७७-६०११०२९२६९४ Kishan Force Light Motor Vehicle Truck Chassis Mounted Jetting Machine वाहन Water Storage Tank Capacity ३००० Liter क्षमता असलेले रु.३१,२५,०००/- या दरामध्ये उपलब्ध आहे.

शासनाच्या GeM पोर्टल वरुन Vehicle Truck Mounted Suction Machine, Chassis Gross Vehicle Weight ७३००KG, Total Tank Capacity (sludge tank+water tank) ३५०० liter व Vehicle Truck Chassis Mounted Jetting Machine वाहन Chassis Gross Vehicle Weight ७४९० KG, Water Storage Tank Capacity ३००० Liter क्षमता असलेले खरेदी करणे कामी एकुण अंदाजे खर्च रु.५५,७५,०००/- मात्र अपेक्षित असुन त्यास मा. प्रशासक तथा आयुक्त सो यांनी दि.२४/०८/२०२३ रोजी आर्थिक व प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

**मागे पहा.**

भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शौचायलांची सेप्टीक टाकी सफाई कामी सक्शन वाहन व सिवर लाईन सफाईकामी जेटींग वाहन खरेदी कामीच्या प्रस्तावास मा.महासभेची मान्यता आवश्यक आहे. सद्या शासनाचे दिनांक १० जुन २०२२ च्या आदेशान्वये मा.आयुक्त यांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेले असल्याने मा.महासभेचे सर्व अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना प्राप्त झालेले आहे. या अधिकार कक्षे नुसार उपरोक्त प्रस्तावास मा. प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांच्या धोरणात्मक निर्णयासाठी सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

**प्रशासकीय ठराव क्रमांक :-** ५९४ **दिनांक :-** 04/10/2024

भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शौचायलांची सेप्टीक टाकी सफाई कामी सक्शन वाहन व सिवर लाईन सफाईकामी जेटींग वाहन खरेदी करणे आवश्यक असुन प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे शासनाच्या GeM पोर्टल वरुन Vehicle Truck Mounted Suction Machine, Chassis Gross Vehicle Weight ७३००KG, Total Tank Capacity (sludge tank+water tank) ३५०० liter व Vehicle Truck Chassis Mounted Jetting Machine वाहन Chassis Gross Vehicle Weight ७४९० KG, Water Storage Tank Capacity ३००० Liter क्षमता असलेले खरेदी करणे कामी एकुण अंदाजे खर्च रु.५५,७५,०००/- मात्र अपेक्षित आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५२ (अ) (१) नुसार दिनांक १० जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री. अजय वैद्य, प्रशासक, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शौचायलांची सेप्टीक टाकी सफाई कामी सक्शन वाहन व सिवर लाईन सफाईकामी जेटींग वाहन खरेदी करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**वरील प्रमाणे ठराव मंजुर**

(अजय वैद्य)
o/c
**प्रशासक**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

**प्रस्तावना:-**

**विषय:-.** भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील कल्याणनाका टीपटॉप स्वीट घुगटनगर ते जनता हॉटेल व दही गल्ली पर्यत सी.सी.रस्ता तयार करणे.(महानगरपालिका क्षेत्रात"मुलभुत सोयीसुविधांचा विकास"या योजने अंतर्गत )

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील कल्याणनाका टीपटॉप स्वीट घुगटनगर ते जनता हॉटेल व दही गल्ली पर्यत सी.सी.रस्ता तयार करणे **बाबत.**कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. **१,९८,५६,५७४**/-मात्रच्या प्रस्तावास मा. आयुक्त सो यांची मंजुरी प्राप्त झाली असुन उक्त कामास मा. प्रशासकीय ठराव क्रं. दिनांक अन्वये प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. **१,९८,५६,५७४**/- ई-निविदा सुचना क्र. ५७/१०७६७८९ (२०२३-२४) दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.२८/८/२०२४ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची **फेर** ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी निविदाकारांची नावे निविदेतील दर एकुण **2 निविदाकार** खालील प्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | निविदाकार | दर |
|---|---|---|
| १ | **मे.हिदुस्थान इंटरप्रायझेज** | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा** –०.५६० **टक्के** कमी **दराने** |
| २ | मे.चंडीका कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |

वरील पैकी **मे.हिदुस्थान इंटरप्रायझेज** यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा **–०.५६०** % कमी दराने म्हणजेच रक्कम रु. **१,९७,४५,३७७**/-(अक्षरी एक कोटी सत्यान्व लाख पंचेचालिस हजार तीनशे सत्त्यातर मात्र )च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

दिनांक :- ०८/१०/२०२४

ठराव क्र.: - ५९६

**मे.हिदुस्थान इंटरप्रायझेज** यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा **–०.५६०** % कमी दराने म्हणजेच रक्कम रु. **१,९७,४५,३७७**/-(अक्षरी एक कोटी सत्यान्व लाख पंचेचालिस हजार तीनशे सत्त्यातर मात्र )ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी **अजय वैद्य**, प्रशासक तथा आयुक्त **भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील कल्याणनाका टीपटॉप स्वीट घुगटनगर ते जनता हॉटेल व दही गल्ली पर्यत सी.सी.रस्ता तयार करणे.** कामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे.हिदुस्थान इंटरप्रायझेज** यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

**प्रस्तावना:-**

**विषय:-. भिवंडी शहरातील वॉर्ड क्र ६ मध्ये सार्वजनिक शौचालय बांधणे.**

मे.सादर,

**भिवंडी शहरातील वॉर्ड क्र ६ मध्ये सार्वजनिक शौचालय बांधणे रक्कम रु. २९,९८,४०५/-** मात्रच्या प्रस्तावास मा. आयुक्त सो यांची मंजुरी प्राप्त झाली असुन उक्त कामास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. **२९,९८,४०५**/-ई-निविदा सुचना क्र. २२/१०५९४७५ (२०२४-२५) दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.२६/०७/२०२४ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी निविदाकारांची नावे निविदेतील दर एकुण **२ निविदाकार** खालील प्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | निविदाकार | दर |
|---|---|---|
| १ | **मे रॉयल कंन्स्ट्रक्शन, भिवंडी** | **अंदाजपत्रकीय दराने** |
| २ | मे.हिदुस्थान इंटरप्रायझेस,भिवंडी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.७५० टक्के जादा दराने |

वरील पैकी **मे रॉयल कंन्स्ट्रक्शन, भिवंडी** यांची अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच रक्कम रु. **२९,९८,४०५/-** (अक्षरी एकोणतीस लक्ष अठ्ठयाण्णव हजार चारशे पाच मात्र ) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.: - ५६७ दिनांक :- 08/10/2024

**मे रॉयल कंन्स्ट्रक्शन, भिवंडी.** यांची अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच रक्कम रु. **२९,९८,४०५/-** (अक्षरी एकोणतीस लक्ष अठ्ठयाण्णव हजार चारशे पाच मात्र ) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी **अजय वैद्य**, प्रशासक तथा आयुक्त **भिवंडी शहरातील वॉर्ड क्र ६ मध्ये सार्वजनिक शौचालय बांधणे** कामी अंदाजपत्रकीय दराचे निविदाकार **मे रॉयल कंन्स्ट्रक्शन, भिवंडी** यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका